ISSN–2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

*Volume–XI, Issue– I* *May – June, 2022*

OPEN ACCESS

Original Research Article

# कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ व या गळतीमुळे त्यांच्या सामाजिक विकासावर झालेल्या दुष्परिणामांचा अभ्यास

***प्रा. डॉ. सुलभा उल्हास पाटील**

*असोसिएट प्राध्यापक, गो.एज्यु. सोसा.चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर.

ईमेल आय डी:: sulbhapatil63@gmail.com

**सारांश :**

*आर्थिकदृष्ट्या गरीब असणाऱ्या विद्यार्थांना गणवेश, पुस्तके इत्यादी गोष्टी मोफत मिळत असल्याने, तेवढ्यावर ते किमान शाळेत हजर राहू शकत होते, मात्र आता मोबाईल, लॅपटॉप्स व डेस्कटॉप्स, टॅब, आयपॅड आणि स्मार्टफोन या साधनां आभावी ते तासांना हजर राहू शकत नाहीत. कोरोनामुळं कर्त्या पुरुषाचं निधन झाल्यानं राज्यातील 20 हजार महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट झाल्याचं एका अभ्यासातून समोर आलंय. अर्थातच अशा आपत्तीत सापडलेल्यांची मुले ऑनलाइन शिक्षणाचा खर्च पेलू न शकल्याने ते शालाबाह्य होऊन गळतीचा धोका जास्त आहेच. कोरोनामध्ये ऑनलाइन शिक्षणाला एक अपरिहार्य महत्त्व आलं आहे. यामध्ये खासगी शाळा, इंग्रजी शाळा स्वाभाविकपणे पुढे आहेत. या सर्वातून आर्थिक, सामाजिक विषमता, व त्याचा इतर क्षेत्रांवरही होणारे दुष्परिणाम हे दुर्लक्षिता येणार नाही. सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ४९ टक्के विद्यार्थ्यांना शाळा अचानक बंद झाल्यामुळे शाळेतर्फे नवीन पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत. ऊसतोडणी मजुरांची मुले, देवदासींची मुले, वेश्याव्यवसायातील स्त्रियांची मुले, बांधकाम क्षेत्रातील मजुरांची मुले, आदिवासी, भटके विमुक्त यांची मुले, व तत्सम परिस्थितीतील मुले व मुली व ग्रामीण-दुर्गम भागातील मुले पाठ्यपुस्तके, गणवेश, व माध्यान्ह भोजन योजना यांच्या आधारानेच शिक्षण घेत असतात. मात्र ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरु झाल्याने हे सर्व बंद तर झालेच पण उलट मोबाईल, इंटरनेट, डेटा पॅक या खर्चांची त्यात भरच पडली.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

*देवदासींची मुले, वेश्याव्यवसायातील स्त्रियांची मुले याना तर खऱ्या अर्थाने अभ्यास व ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी घरच उपलब्ध नसते.वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांची मुले, बांधकाम क्षेत्रातील मजुरांची मुले, आदिवासी, भटके विमुक्त यांची मुले, व तत्सम परिस्थितीतील मुले व मुली व ग्रामीण-दुर्गम भागातील मुले हे सर्व बहुधा उघड्यावर घरे करून राहतात. रोजचे जीवन हे विजेशिवाय वा अत्यंत कामचलाऊ विजेवर चालते. ग्रामीण भागात तर रोजच दहा-दहा तास वीज नसते, व ती सुद्धा अपरात्री वा पहाटे केंव्हातरी येते. बाकी नेट, मोबाईल इत्यादी गोष्टी तर फारच लांब राहिल्या.ही सर्व मुले शिक्षणाच्या प्रवाहातून आपोआप दूर फेकली जात आहेत.*

ISSN–2278-5655

AMIERJ AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

*Volume–XI, Issues– I* *May – June, 2022*

OPEN ACCESS Original Research Article

*भारतातील केवळ २४ टक्के कुटुंबांकडे स्मार्टफोन्स आहेत. ५ ते १८ या वयोगटातील मुले असलेल्या केवळ ११.५ टक्के घरांमध्ये कम्प्युटर आणि इंटरनेट कनेक्शन आहे.*

**बीज संज्ञा:** *कोव्हिड-१९, सामाजिक व्यवहार, ऑनलाईन शिक्षण.*

**प्रस्तुत संशोधनानुसार निष्कर्ष:** यासाठी केवळ ऑनलाइन शिक्षणाचा अट्टहास न करता संमिश्र पद्धतीचा पुरस्कार, स्मार्टफोन, इंटरनेट,आदी सुविधा सुद्धा मोफत पुरविण्याची कायदेशीर तरतूद,व याच धर्तीवर वंचित, भटके, ग्रामीण, आदिवासी, बालमजूर, विट, ऊस, बांधकाम, वेश्याव्यवसाय, देवदासी...इत्यादींच्या मुलांसाठी खास योजना राबविणे अत्यंत महत्वाचे आहे.

**प्रस्तावना:**

कोव्हिड-१९ च्या दोन वर्षांच्या कालखंडात ऑनलाईन शिक्षणाचा स्वीकार केला गेला. त्यापूर्वी तंत्रज्ञानाधारित शिक्षण आलेले आले तरी प्राधानयाने उच्च शिक्षणातच आवश्यकतेनुसार मिश्र पद्धतीचा वापर होऊन काही प्रमाणात तंत्रज्ञानाधारित शिक्षण वापरात होते. नाईलाजाने सामाजिक व्यवहारांवर नियंत्रण आल्याने शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर ऑनलाईन शिक्षणामुळे मोबाईल, संगणक, लॅपटाप यांचा वापर करणे अपरिहार्य ठरले.दूर अंतर राखून शिक्षण घेणे त्यामुळे आवाक्यात तर आले पण त्यामुळे फक्त माहिती संक्रमित होऊ शकली, शिक्षणातून होणारा सामाजिक विकास हा सुद्धा विद्यार्थ्यापासून दूर अंतरावरच राहिला. उलट ऑनलाईन शिक्षणामुळे मोबाईल, संगणक, लॅपटाप यांचा वापर वाढल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या. आधीच गरिबी, दारिद्र्य, विषमता, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी या समस्या तर होत्याच, आता मात्र सुरुवातीलाच ज्याच्याकडे किमान मोबाईल, इंटरनेट सुविधा, किमान मोबाईल वापराची माहिती या गोष्टी असतील तर आणि तरच शालेय शिक्षणात प्रवेश करणे शक्य होते. गेल्या वर्षी स्मार्टफोन नाही म्हणून सहा विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे समाजवास्तव आहे. "शाळा ही समाजाचे प्रतिबिंब असते," ही जॉन ड्युई ची शाळेबद्दलची प्रतिमाच या ऑनलाईन शिक्षणामुळे हरवून गेली.मुलांचा सर्वांगीण विकास, सामाजिकीकरण, आंतरक्रिया इत्यादी गोष्टी, ज्या शाळा या संकल्पनेत अभिप्रेत होत्या त्या या कोरोनाच्या व ऑनलाईन शिक्षणाच्या गदारोळात हरवून गेल्याच उलटपक्षी डोळे, पाठ इत्यादी विकार बालवयातच होण्यास प्रारम्भ झाला आहे. ऑनलाइन शिक्षण आणि त्यामुळे आलेली जीवनशैली ज्या पद्धतीने मुलांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करत आहे ते बघता याचा मुलाच्या आयुष्यावर दीर्घकाळ परिणाम होऊ शकतो. आपल्याला पुढील पिढीने अशा पद्धतीने शिकणे व वाढणे अपेक्षित आहे का, त्यातील समस्या नेमक्या कोणत्या आहेत व त्या कशारीतीने दूर करता येतील हे अभ्यासणे ही आजची मूलभूत गरज आहे.

**संशोधनाची गरज:** "कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ व या गळतीमुळे त्यांच्या सामाजिक विकासावर झालेल्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे ही आजच्या शिक्षणाची मूलभूत गरज आहे.नदीला आलेला पूर जसा निघून गेल्यावर मागील दृश्य जसे विदारक असते त्याप्रमाणे कोरोनाची लाट आज कमी झाल्यावर ऑनलाईन शिक्षणामुळे झालेली दुरावस्था प्रत्ययास येते आहे.

- आधीच मुलींना शिक्षण देण्याचा कल कमीच आहे. त्यात गरिबीमुळे – मोबाईल, इंटरनेट ...इत्यादी सुविधा उपलब्ध होत

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

- नसतील तर शिकवण्यापेक्षा 'मुलीचं शिक्षण बंद आहे, पैसे नाहीत, त्यामुळे लग्न लावण्याचा विचार केला' जाणे स्वाभाविक असते.हे परत समाजाला मध्ययुगाकडे नेण्यासारखे आहे.
- मुलं घरीच बसली तर शाळेबद्दल नकारात्मकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.
- एका सर्वेनुसार विद्यार्थ्यांची गणित आणि भाषा या विषयांची क्षमता बाधित झाली आहे. ज्या मुलांच लेखन-वाचन घसरतं ती शाळेतून बाहेर पडतात. ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थ्यांचे लेखन वाचन घसरेल त्यांची शाळेबाबतची रुची कमी होईल. त्यामुळे विद्यार्थी शाळा कायमची सोडण्याचा धोका वाटतो.
- राज्यातील दुर्गम भागात जिथे पालकांकडे मोबाईल नाहीत, गावात रेंज नाही अशा भागांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावं लागत आहे. शिक्षण बंद असल्याने असे विद्यार्थी बालमजुरीकडे वळण्याची देखील शक्यता आहे.यांसारख्या अनेक नकारात्मक गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. विद्यार्थ्यांची गळती अशीच होत राहिली तर शाळाबाह्य मुलांच्या संख्येत भर पडत राहील त्यातून बालविवाह, मुलींचे शिक्षणातील व उच्च शिक्षणातील प्रमाण कमी, बालमजुरी मध्ये वाढ, बेरोजगारी व एकूणच सामाजिक विकास कमी होऊन आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासावर दुष्परिणाम होत आहेत व त्यात अजूनच भर पडेल.त्यामुळे या सदर विषयावर संशोधन होऊन त्यावर नेमके उपाय शोधणे फार गरजेचे आहे.

**समस्या विधान:**

"कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ व या गळतीमुळे त्यांच्या सामाजिक विकासावर झालेल्या दुष्परिणामांचा अभ्यास."

**उद्दिष्ट्ये:**

१. कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ कशी व का झाली आहे याचा शोध घेणे.

२. कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ व या गळतीचा समाजावर झालेल्या दुष्परिणामांचा शोध घेणे.

**गृहीतके :**

१. शिक्षण प्रकार हा विद्यार्थ्याच्या समस्या सोडविणारा व विद्यार्थ्यांना शालेय मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणारा असेल तर विद्यार्थी गळतीत वाढ होणार नाही.

२. विद्यार्थी गळती झाली नाही तर सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास होण्यास मदत मिळेल.

**संशोधन परिकल्पना:** विद्यार्थी गळती झाली नाही तर सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास होण्यास मदत मिळेल.

**शून्य परिकल्पना:** विद्यार्थी गळती झाली नाही तर सर्व विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास होण्यास मदत मिळणार नाही.

**कार्यात्मक व्याख्या:**

१. कोव्हिड-१९ - कोरोनाव्हायरस रोग २०१९ (कोविड -१९) हा एक अति संसर्गजन्य रोग आहे जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम-

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

२. संबंधित कोरोनाव्हायरस २ अथवा (एसएआरएस-कोव्ह-२) (SARS-CoV-2) या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स (SARS-CoV-1) या रोगाने आग्नेय आशियामधे थैमान घातले होते. त्या कोरोनाव्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे.

३. जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोना व्हायरस रोग २०१९ (कोविड -१९) चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला जागतिक महामारी जाहीर केले.

४. ऑनलाइन शिक्षण- सोप्या भाषेत, आपण ऑनलाइन शिक्षण ही एक प्रणाली समजू शकतो ज्याद्वारे विद्यार्थी स्वतःच्या घरातून इंटरनेट आणि संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन आणि टॅब्लेट यांसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे शिक्षण घेऊ शकतात. या नव्या शिक्षण पद्धतीत अंतर आणि वेळ यांचे अडथळे पूर्णपणे दूर झाले आहेत.

५. गळती - आपल्या देशात सुमारे सहा कोटीच्या वर मुले शाळेबाहेर आहेत. प्राथमिक स्तरावर शाळेत जायच्या वयातील शाळेत जाणाऱ्या मुलांची सरासरी ९५ टक्के असली तरी त्यातील ४४ टक्के मुलेच दहावीपर्यंत पोचतात, ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे प्रारंभापासून शाळेतच जात नाहीत, अशा मुलांची संख्या खूप कमी म्हणजे ५ टक्केच आहे. गळती होते ती नंतर. म्हणूनच या अर्थाने, गॅरिव्हिया असे सांगतात की: "शाळेत आणि सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक संदर्भात निर्माण होणाऱ्या घटकांच्या संयोजन अभावामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रणालीचा त्याग करणे म्हणजे गळती वा शाळा सोडणे होय."

६. उशीरा ड्रॉपआउट: म्हणजे जेव्हा विद्यार्थी शैक्षणिक योजना मध्येच पूर्णपणे सोडून देतो आणि परत न येण्याचा निर्णय घेतो.

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :**

**व्याप्ती** : वेळेअभावी फक्त इंटरनेटवर उपलब्ध असणारी आकडेवारीच या संशोधनासाठी गृहीत धरण्यात आलेली आहे,ही या संशोधनाची मर्यादा आहे.

**संशोधन पद्धती :** या संशोधनासाठी टेबल वर्क ही पद्धत उपयोगात आणलेली आहे.

**संशोधन प्रक्रिया :** इंटरनेटवर उपलब्ध असणारी आकडेवारीचे विश्लेषण करुन संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**माहिती निर्वाचन :**

संपूर्ण विश्वातच कोव्हिड -१९ चा प्रादुर्भाव झाल्याने व या माहितीची व्याप्ती प्रचंड असल्याने संशोधनासाठी प्रत्यक्ष माहिती जमविणे सोपे नसल्याने, गुगलच्या माहितीवरून व गुगलवर आलेल्या एका सर्व्हेच्या माहितीवरुन माहिती निर्वाचन करण्यात आलेले आहे- सध्या आर्थिकदृष्ट्या गरीब असणाऱ्या विद्यार्थांना गणवेश, पुस्तके इत्यादी गोष्टी मोफत मिळत असल्याने, तेवढ्यावर ते किमान शाळेत हजर राहू शकत होते, मात्र आता मोबाईल, लॅपटॉप्स व डेस्कटॉप्स, टॅब, आयपॅड आणि स्मार्टफोन या साधनां आभावी ते तासांना हजर राहू शकत नाहीत.

डेटा पॅकेज मर्यादित असल्याने सर्व वर्गांना उपस्थित राहणे कठीण जात आहे, असे ११ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले. वारंवार डेटा पॅक रिचार्ज करण्याचा अतिरिक्त आर्थिक बोजाही त्यांच्या कुटुंबांवर पडत आहे. खर्चाचा दुसरा घटक म्हणजे अभ्यासाचे साहित्य.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ४९ टक्के विद्यार्थ्यांना शाळा अचानक बंद झाल्यामुळे शाळेतर्फे नवीन पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत. ऊसतोडणी मजुरांची मुले, देवदासींची मुले, वेश्याव्यवसायातील स्त्रियांची मुले, बांधकाम क्षेत्रातील मजुरांची मुले, आदिवासी, भटके विमुक्त यांची मुले, व तत्सम परिस्थितीतील मुले व मुली व ग्रामीण-दुर्गम भागातील मुले पाठ्यपुस्तके, गणवेश, व माध्यान्ह भोजन योजना यांच्या आधारानेच शिक्षण घेत असतात.मात्र ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरु झाल्याने हे सर्व बंद तर झालेच पण उलट मोबाईल, इंटरनेट, डेटा पॅक या खर्चांची त्यात भरच पडली. देवदासींची मुले, वेश्याव्यवसायातील स्त्रियांची मुले याना तर खऱ्या अर्थाने अभ्यास व ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी घरच उपलब्ध नसते.वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांची मुले, बांधकाम क्षेत्रातील मजुरांची मुले, आदिवासी, भटके विमुक्त यांची मुले, व तत्सम परिस्थितीतील मुले व मुली व ग्रामीण-दुर्गम भागातील मुले हे सर्व बहुधा उघड्यावर घटे करून राहतात. रोजचे जीवन हे विजेशिवाय वा अत्यंत कामचलाऊ विजेवर चालते. ग्रामीण भागात तर रोजच दहा-दहा तास वीज नसते, व ती सुद्धा अपरात्री वा पहाटे केंव्हातरी येते. बाकी नेट, मोबाईल इत्यादी गोष्टी तर फारच लांब राहिल्या.ही सर्व मुले शिक्षणाच्या प्रवाहातून आपोआप दूर फेकली जात आहेत. भारतातील केवळ २४ टक्के कुटुंबांकडे स्मार्टफोन्स आहेत. ५ ते १८ या वयोगटातील मुले असलेल्या केवळ ११.५ टक्के घरांमध्ये कम्प्युटर आणि इंटरनेट कनेक्शन आहे.

उपकरणे दिवसभर मिळत नाहीत, असे २३ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले. घरात एखादेच उपकरण असेल, तर त्याचा वापर पालक, अन्य भावंडे अशा सर्वांमध्ये विभागला जातो. दीर्घकाळ वर्ग चालत असल्याने बॅटरी रिचार्ज करण्यासाठीही वेळ मिळत नाही, असे अनेकांनी नमूद केले. इंटरनेटची कनेक्टिविटी नीट नसणे हे आव्हान तर बहुतेकांपुढे आहे.

डेटा पॅकेज मर्यादित असल्याने सर्व वर्गांना उपस्थित राहणे कठीण जात आहे, असे ११ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले. वारंवार डेटा पॅक रिचार्ज करण्याचा अतिरिक्त आर्थिक बोजाही त्यांच्या कुटुंबांवर पडत आहे.

आदिवासी समाजातील 90 टक्के पालकांकडे स्मार्ट फोन, इंटरनेट नेटवर्क, मोबाईल रिचार्जकरिता रोख रक्कम नाही. पाठ्यपुस्तके, नोटबुक नाहीत. शिवाय घरी अभ्यासासाठी पोषक वातावरण नाही. अशा समस्यांमध्ये मार्च ते जून असा चार महिन्यांचा आदिवासी मुलांचा अभ्यास बुडाला आहे.

गावाकडे गेलेले आदिवासी विद्यार्थी शेती व इतर किरकोळ कामांत पालकांना मदत करीत आहेत. त्यामुळे ते शैक्षणिक प्रवाहातून दूर फेकले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी आदिवासी मुलांच्या आश्रमशाळा नियमित सुरू असत्या तर, मुलांना नाश्ता, भोजन, शालेय साहित्य व इतर ऑनलाइन शिक्षणासाठी लागणारे साहित्य शासनाने पुरविले असते. मात्र, कोरोना संकटात या विभागाने सर्व जबाबदारी आदिवासी पालकांवर सोडून दिली आहे. तरीही आश्रमशाळांचे शिक्षक व आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांवर शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत.

पण, त्याचा आदिवासी समाजातील मुलांना तिळमात्र उपयोग होणार नाही, याचा विचार या विभागाला करण्याची गरज निर्माण झाली आहे. इगतपुरी तालुक्यातील काही आदिवासी भागातील मुले कुटुंबाला आर्थिक आधार देत रस्त्यावर रानभाज्या विकण्याचे

ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

काम करत असल्याचे दिसत आहे. यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांकडून व्यक्त होत आहे.

खिमेश बढिये {लेखक शाळाबाह्य विद्यार्थी शोध मोहीम 'संघर्ष वाहिनी'बरोबर काम करतात.} यांच्या लेखानुसार - मुलींचे शिक्षण ही अधिक गंभीर समस्या आहे. १५ ते १८ वयोगटातील ४० टक्के मुलींची गळती होते. सहा ते १७ वयोगटातील १३ कोटी मुली शाळाबाह्य आहेत. लोकसभेतील आकडेवारीनुसार मुलींच्या गळतीचे प्रमाण आसाम (३५.२), त्रिपुरा (२७.३), बिहार (३३.७), मध्य प्रदेश (२४.२), ओरिसा(२७.८) टक्के इतके आहे. देशात एकूण २० लाख देहविक्रेत्या महिलांपैकी ४० टक्के अल्पवयीन आहेत. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणात अल्पवयात लग्न होणाऱ्या मुलींची संख्या ४७.४ टक्के आहे. म्हणजे, देशात दर दोनपैकी एका मुलीचा आजही बालविवाह होतो.

महाराष्ट्रातील बालविवाहाचे प्रमाण २६.४ टक्के आहे. देशातील सर्वांत जास्त बालविवाह होत असलेले ७० पैकी १७ जिल्हे महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी परभणी (४८), बीड (४३.७), हिंगोली (३७), जालना (३५) इतके बालविवाहाचे प्रमाण आहे. शाळाबाह्य सर्वेक्षणात नववी ते बारावीपर्यंतच्या मुलींची संख्या १३ लाख १५ हजार ८६५ दाखवली असली, तरी यात किती मुलींनी लग्नानंतर शाळा सोडली, हे स्पष्ट नाही. भारतात बालविवाहाचे प्रमाण २६ टक्के आहे. मराठवाडा, विदर्भात प्रचंड बालविवाह होतात. मराठवाड्यात ३६.६ टक्के बालविवाह असतात. लग्नामुळे किती मुलींची शाळा कायमची सुटली, याचा साधा उल्लेखही सरकारी सर्वेक्षणात नाही.

शिक्षण विभागाच्या शाळाबाह्य मुलांच्या शोधमोहीम अहवालात या मुलांसोबत स्थलांतरित, बालमजूर, करोना काळात शाळांमध्ये न गेलेली मुले अशी आकडेवारी आहे. शिक्षण हक्क अधिकार कायदा धाब्यावर बसवत, शाळाबाह्य मुलांची ही शोधमोहीम झाली. या मोहिमेची आकडेवारी राज्यातील शाळाबाह्य मुले, बालमजूर, स्थलांतरित मुले यांची नेमकी संख्या सांगत नाही.

**सामाजिक ताण:**

कोरोनामुळं कर्त्या पुरुषाचं निधन झाल्यानं राज्यातील २० हजार महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट झाल्याचं एका अभ्यासातुन समोर आलंय. १२४ तालुक्यात याबाबत सर्वेक्षण करण्यात आलं. त्यामुळे राज्य सरकारनं या विधवा महिलांना भरघोस मदत द्यावी. अशी मागणी एकल महिला पुनर्वसन समितीचे हेरंब कुलकर्णी यांनी केलीय. अर्थातच अशा आपत्तीत सापडलेल्यांची मुले ऑनलाइन शिक्षणाचा खर्च पेलू न शकल्याने ते शालाबाह्य होऊन गळतीचा धोका जास्त आहेच.

आदिवासी विभागात १०४८ आश्रमशाळांत चार लाख पन्नास हजार लाख मुलं आणि समाजकल्याणच्या ९२० आश्रमशाळांत एक लाख वीस हजार विद्यार्थी शिकत आहेत. मर्यादित जागा असल्यानं आणि सोशल डिस्टन्सिंगचं पालन होऊ शकत नसल्यानं आश्रमशाळा सुरू होऊ शकत नाही, अशी आजची स्थिती आहे. त्यात आदिवासी भागांतले विद्यार्थी डोंगराळ भागात राहत असल्यानं ऑनलाईन शिक्षणाचीही अजिबात शक्यता नाही. अशा स्थितीत अगोदरच आदिवासी, भटक्या-विमुक्तांच्या विद्यार्थ्यांमध्ये गरिबीमुळे गळतीचं प्रमाण मोठं असल्यानं सतत शाळा बंद या कारणानं या विद्यार्थ्यांची पुन्हा मोठ्या प्रमाणात गळती होण्याचा धोका संभवतो. आश्रमशाळांमध्ये किमान दोन वेळचं जेवण नाश्ता नियमितपणे या विद्यार्थ्यांना मिळत होतं. ते आता बंद

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

झाल्यानं आणि कुटुंबाची ओढाताण असल्यामुळे या विद्यार्थ्यांचं कुपोषण होण्याचीही दाट शक्यता आहे. अंगणवाडी शिक्षण हे वंचित, ग्रामीण मुलांसाठी आहे. आज घरपोच शिधा दिला जातो आहे; पण नीट प्रमाणित आहार दिला गेला नाही तर कुपोषण वाढेल. पुन्हा मुलं अंगणवाडीत येऊ शकत नसल्यानं शिक्षण होऊ शकणार नाही. या वयात मेंदूचा विकास अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे एकूणच ग्रामीण लेकरांच्या सर्वांगीण विकासावरच परिणाम होतो आहे.

दिव्यांग मुलांची प्रतिकारशक्ती मुळातच कमी असल्यानं संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे बहुसंख्य मुलं आज घरी आहेत. त्यात कमी दिव्यांग आता असलेली मुलं जिल्हा परिषद आणि खासगी शाळांत जाऊ शकतील; पण विशेष दिव्यांगता असलेल्या आणि जास्त दिव्यांग असलेल्या मुलांचं शिक्षण पूर्णपणे थांबणार आहे, हे कटू सत्य आहे. सरकारनं नेमलेले दिव्यांग शिक्षक सर्वत्र पोचू शकत नाहीत. त्यामुळे दिव्यांगांचं शिक्षण मागं टाकलं जातं की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे.

कोरोनामध्ये ऑनलाइन शिक्षणाला एक अपरिहार्य महत्त्व आलं आहे. यामध्ये खासगी शाळा, इंग्रजी शाळा स्वाभाविकपणे पुढे आहेत. त्यांच्याकडे विद्यार्थी हा आर्थिक सुस्थितीतल्या वर्गातला असल्यामुळे त्यांचं शिक्षण सुरूही झालेलं आहे. वंचित वर्गातल्या विद्यार्थ्यांना या सुविधा कमी प्रमाणात असल्यानं खासगी शिक्षणाच्या तुलनेत मागं पडून स्पर्धेत विद्यार्थी मागं पडतील का? ऑनलाईनवाले आणि ऑफलाइनवाले असे नवे वर्ग तयार होतील का? यातून वंचित मुलांमध्ये एक न्यूनगंड विकसित होईल असं वाटतं. या सर्वातून आर्थिक, सामाजिक विषमता, व त्याचा इतर क्षेत्रांवरही होणारे दुष्परिणाम हे दुर्लक्षिता येणार नाही.

**समारोप:**

यासाठी केवळ ऑनलाइन शिक्षणाचा अट्टहास न करता संमिश्र पद्धतीचा पुरस्कार, स्मार्टफोन, इंटरनेट,आदी सुविधा सुद्धा मोफत पुरविण्याची कायदेशीर तरतूद,व याच धर्तीवर वंचित, भटके, ग्रामीण, आदिवासी, बालमजूर, विट, ऊस, बांधकाम, वेश्याव्यवसाय, देवदासी...इत्यादींच्या मुलांसाठी खास योजना राबविणे अत्यंत महत्वाचे आहे.

**संदर्भ:**

१) https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%95%E0%A5%8B%E0%A4%B0%E0%A5%8B%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%B5%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%AF%E0%A4%B0%E0%A4%B8_%E0%A4%B0%E0%A5%8B%E0%A4%97_%E0%A5%A8%E0%A5%A6%E0%A5%A7%E0%A5%A

२) https://www.google.com/search?q=%E0%A4%91%E0%A4%A8%E0%A4%B2%E0%A4%BE%E0%A4%87%E0%A4%A8+%E0%A4%B6%E0%A4%BF%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B7%E0%A4%A3+%E0%A4%AE%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%A3%E0%A4%9C%E0%A5%87+%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%AF&rlz=1C1CHBD_enIN929IN929&oq=%E0%A4%91%E0%A4%A8%E0%A4%B2%E0%A4%BE%E0%A4%87%E0%A4%A8+%E0%A4%B6%E0%A4%BF%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B7%E0%A4%A3+%E0%A4%AE%E0%A5%8D&aqs=chrome.1.69i57j0i512j0i22i30.15900j0j15&sourceid=chrome&ie=UTF-8

३) https://navprabha.com/%E0%A4%B6%E0%A5%88%E0%A4%95%E0%A5%8D%E0%A4%B7%E0%A4%A3%E0%A4%BF%E0%A4%95-%E0%A4%97%E0%A4%B3%E0%A4%A4%E0%A5%80-%E0%A4%86%E0%A4%A3%E0%A4%BF-%E0%A4%89%E0%A4%AA%E0%A4%BE%E0%A4%AF/

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issues– I May – June, 2022

OPEN ACCESS Original Research Article

४) https://unate.org/mr/Educacion/que-es-la-desercion-estudiantil-universitaria.html

५) https://www.bbc.com/marathi/india-59966101

६) https://www.esakal.com/vidarbha/no-school-no-education-tribal-children-have-not-smart-mobiles-online-education-320333

७) https://marathi.abplive.com/videos/news/nasik-heramb-kulkarni-took-initiative-for-widows-lost-husband-in-pandemic-999725

*Cite This Article:*

***प्रा. डॉ. सुलभा उल्हास पाटील,** *(2022).* कोव्हिड-१९ या काळात ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीत झालेली वाढ व या गळतीमुळे त्यांच्या सामाजिक विकासावर झालेल्या दुष्परिणामांचा अभ्यास, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (III) May – June,*** *151-158.*